महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन ज्ञापन क्रमांक : पोप्रमा-१०१७/प्र.क्र.५१४/पोल-७.

मंत्रालय, दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : १७ नोव्हेंबर, २०१७.

<u>**विषय**</u> :- पोलीस अधीक्षक, नांदेड, यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस ठाणे, तामसा, तालुका-हदगांव, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

<u>**संदर्भ**</u> :-
1) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१४/ प्र.क्र.४९/ १४/ विनियम, दिनांक ०५.०१.२०१५.
2) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
3) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पोमसं/ २७-बी/ २८-बी-२/ नांदेड-पो.स्टे.-तामसा-प्रशा.-इमा.-व-निवा./ २३९/ २०१७, दिनांक ३१.०८.२०१७.

ज्ञापन.-

पोलीस अधीक्षक, नांदेड, यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस ठाणे, तामसा, तालुका-हदगांव, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी सादर केला आहे.

२. उक्त कामासाठी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, हदगांव, जिल्हा-नांदेड, यांनी सन २०१७-१८ च्या दरसूचीनुसार तयार केलेले रु.३४४ लक्ष इतक्या खर्चाचे अंदाज सादर केले आहेत. हे खर्चाचे अंदाज, (१) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, (२) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, नांदेड, आणि (३) पोलीस अधीक्षक, नांदेड, यांनी साक्षांकित केले आहेत.

३. उक्त खर्चाचे अंदाज हे सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी तपासले आहेत व ते **रु.३०४.८० लक्ष** असे सुधारित केले आहेत आणि विवक्षित अटींवर प्रशासकीय मान्यता देण्यास सहमती दिली आहे.

४. त्या अनुसार, पोलीस अधीक्षक, नांदेड, यांच्या अधिकारक्षेत्रातील पोलीस ठाणे, तामसा, तालुका-हदगांव, याच्याकरिता नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करण्यासाठी **रु.३०४.८० लक्ष** इतक्या खर्चाच्या अंदाजास, पुढील अटींवर, याद्वारे, प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे:-

1) बांधकामाचा नमुना नकाशा, मांडणी नकाशा आणि विस्तृत नकाशा यांना वास्तुशास्त्रज्ञाकडून मंजूरी घेऊनच काम सुरु करावे.

२) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतुदींबाबत विस्तृत खर्चाचे अंदाज मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करताना शासन निर्णय, पर्यावरण विभाग, क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१, दिनांक १०.०१.२०१४, अनुसार कार्यवाही करावी.

४) शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक बीडीजी-२०१७/ प्र.क्र.६०/ इमारती-२, दिनांक ०७.०७.२०१७, अनुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) खर्चाचे अंदाज हे मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, औरंगाबाद, यांनी साक्षांकित करावे.

६) निधी उपलब्ध झाल्याशिवाय बांधकामास सुरवात करु नये.

५. उक्त कामासाठी येणारा खर्च हा गृह विभाग--मागणी क्रमांक बी-१०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ८००, इतर खर्च, (००)(११) महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतीचे बांधकाम करणे, (४०७० ०२११), ५३, मोठी बांधकामे, याखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. हे ज्ञापन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.७२९/इमा-२, दिनांक १६.१०.२०१७, अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०१७१११७१८१५०३९९२९ असा आहे. हे ज्ञापन डीजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swapnil Gopal Borse

Digitally signed by Swapnil Gopal Borse
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=66835707253ff77ef0e333eb3ad582f9b876d443b2654088832e43dcad21c52a, cn=Swapnil Gopal Borse
Date: 2017.11.17 18:19:02 +05'30'

(स्वप्नील गोपाल बोरसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) विशेष पोलीस महानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र, नांदेड.
३) पोलीस अधीक्षक, नांदेड.

प्रत:-

१) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, औरंगाबाद *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*

२) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडल, नांदेड *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*

३) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, भोकर, जिल्हा-नांदेड *(सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांनी दिलेल्या "Recapitulation Sheet" च्या प्रतीसह).*

४) जिल्हा कोषागार अधिकारी, नांदेड.

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.

६) कार्यासन अधिकारी (इमा-२), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) कार्यासन अधिकारी, वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.

८) निवड फाईल (पोल-७).